# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ९४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.१६ ऑगस्ट, २०१६ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ९४ वी बैठक मंगळवार, दि.१६ ऑगस्ट, २०१६ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. मालदार एन. एन. - मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. नंदनवार डी. आर., प्रभारी सहसंचालक, (तंत्र शिक्षण) पुणे मा. संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | श्री. शेवाळे बी. सी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| ५) | डॉ. मिश्रा डी. एन., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. मा. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व श्री. पाटील बी. पी., परीक्षा नियंत्रक हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] २६ जुलै, २०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

ठराव: २६ जुलै, २०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

| |
|---|
| १) पान क्र.२१ वर ठराव क्र.८(९) मध्ये अ.क्र. मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| मूळ ठरावातील अ.क्र.५ |
| रु.१८,०३,५४५/- या किंमतीस HPLC (High Performance Liquid Chromatography) घेण्यास व अंदाजे रु.२,००,०००/- किंमतीची accessories; आवश्यकतेनुसार वार्षिक दरकरार (AMC) करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. |
| दुरुस्त अ.क्र.५ |
| न्यूनतम दर असलेले फर्म M/s. Agilent Technologies India Pvt. Ltd, Bangalore यांच्याकडून HPLC (High Performance Liquid Chromatography) रु.१८,०३,५४५/-, Accessories अंदाजे रुपये २,६०,०००/-, AMC charges for ४$^{th}$ year रुपये ५२,०००/- (+ Taxes) व for ५$^{th}$ year रुपये ५६,०००/- (+ Taxes) असा एकूण अंदाजे खर्च रुपये २१,७१,५४५/- (+ Taxes) व खर्च रुसाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| २) पान क्र.२७ वर ठराव क्र.८(१५) मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| मूळ ठराव क्र.८(१५) |
| विद्यापीठामध्ये संगणक हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि नेटवर्क कामाकरिता एक एक्सपर्ट नियुक्त करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| दुरुस्त ठराव क्र.८(१५) |
| विद्यापीठामध्ये संगणक हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि नेटवर्क कामाकरिता एकत्रित वेतनावर एक एक्सपर्ट नियुक्त करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

[ ०२ ] **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

ठराव: **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या दि.१५/०७/२०१६ पासून दि.०४/०८/२०१६ पर्यंतचा आढावा अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] विद्यापीठातील दीक्षांत समारंभाकरिता मल्टिपर्पज हॉल बांधण्याच्या रु.२.७१ कोटीच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठातील दीक्षांत समारंभाकरिता मल्टिपर्पज हॉल बांधण्याकरिता सन २०१५-१६ च्या बांधकाम विभागाच्या DSR नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. याची किंमत रु.२.२५ कोटी इतकी होती. त्यास दि.२५/०८/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

परंतु आता बांधकाम विभागाचा सन २०१६-१७ चा DSR आला असल्यामूळे त्यानुसार वरील कामाचा अंदाजपत्रक दुरुस्त केल्याशिवाय यास बांधकाम विभाग तांत्रिक मंजूरी देत नाहीत. त्यामूळे सदर अंदाजपत्रक सन २०१६-१७ च्या DSR नुसार दुरुस्त करण्यात आले असून त्याची किंमत रु.२.७०,८३,०००/- अशी येत आहे. त्यामूळे सदर अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाब प्रथमत: बांधकाम समितीसमोर सादर करावे लागणार आहे व बांधकाम समितीच्या शिफारशीनंतर अंतिम मान्यतेकरिता व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करुन व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक मंजुरीकरिता प्रस्ताव सादर करावे लागणार आहे.

उक्त कामाकरिता बांधकाम समितीच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेला शिफारस केलेली आहे.

सबब, उपरोक्त सर्व बाबी अवलोकनी घेता, विद्यापीठातील दीक्षांत समारंभाकरिता मल्टिपर्पज हॉल बांधण्याच्या रु.२.७१ कोटीच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठातील दीक्षांत समारंभाकरिता मल्टिपर्पज हॉल बांधण्याच्या रु.२.७१ कोटीच्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] विद्यापीठ परिसरातील १) रेन वॉटर हार्वेस्टींग २) ड्रेनेज लाईन टाकणे ३) वेस्ट वॉटर प्लांट बसविणे या कामाकरिता मे. उर्जल कन्सल्टंट प्रा. लि., पुणे यांच्या नमूद केलेल्या दराप्रमाणे कन्सल्टंट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट या कामासाठी नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: RUSA अंतर्गत विद्यापीठ परिसरातील १) रेन वॉटर हार्वेस्टींग २) ड्रेनेज लाईन टाकणे ३) वेस्ट वॉटर प्लांट बसविणे हे कामे करण्याकरिता दि.२८/०६/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.२१ अन्वये शिफारस करण्यात आलेल्या कन्सल्टंटच्या यादीमध्ये उर्जल कन्सल्टंट प्रा. लि., पुणे यांच्या नावाचा समावेश केलेला आहे.

उक्त बाबीस अनुसरुन सर्व कंपनीशी याबाबत विचारणा केली असता, त्यापैकी फक्त दोघांनी काम करण्यासाठी सहमती दर्शविलेली होती. त्यास अनुसरुन प्रस्तूत कार्यालयाच्या दि.१२/०७/२०१६ रोजीच्या टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदयांनी या कामाकरिता कन्सल्टंट म्हणून मे. उर्जल कन्सल्टंट प्रा. लि., पुणे यांची नियुक्ती करण्यास मान्यता दिलेली होती. सदर मान्यतेस अनुसरुन प्रस्तूत कार्यालयाचे दि१८/०७/२०१६ रोजीचे पत्र क्र.सोविसो/अभि.विभाग/२०१६-१७ / ६६९४ अन्वये मे. उर्जल कन्सल्टंट प्रा. लि., पुणे यांना नियुक्ती पत्र देण्यात आलेली आहे.

त्यानुसार उर्जल कन्सल्टंट प्रा. लि., पुणे यांच्या प्रतिनिधीनी दि.२५/०७/२०१६ रोजी विद्यापीठास समक्ष भेट देवून सर्व जागेची पाहणी करुन काम करण्याबाबतचा अहवाल व त्यांची शुल्क याबाबत त्यांच्या उपरोक्त ईमेलद्वारे कळविलेले आहे.

सदरच्या ईमेलद्वारे त्यानी प्लॅनिंग व डिझाईनिंग याकरिता प्रोजेक्टच्या किंमतीवर २% शुल्क व काम सुरु झाल्यानंतर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी या कामाकरिता प्रोजेक्टच्या किंमतीवर २% शुल्काची मागणी केलेली आहे. उपरोक्त कामापैकी प्लॅनिंग व डिझाईनिंग करण्याकरिता त्यांना सर्व लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता केल्यांनतर फक्त पंधरा दिवसाचा कालावधी लागेल असे त्यांनी ईमेलमध्ये नमूद केले आहे.

तसेच सदर काम सुरु झाल्यानंतर पूर्ण होण्याकरिता चार ते सहा महिने लागणार असल्योच नमूद केलेले असून, सदर कामासाठी त्यांचे फक्त सहा Site Visit होतील असे नमूद केलेले आहे.

वरीलप्रमाणे प्लॅनिंग व डिझाईनिंग याकरिता प्रोजेक्टच्या किंमतीवर २% शुल्क व काम सुरु झाल्यानंतर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्सी या कामाकरिता २% शुल्काची मागणी केलेली आहे.

सबब, उपरोक्त सर्व बाबी अवलोकनी घेता, विद्यापीठ परिसरातील १) रेन वॉटर हार्वेस्टींग २) ड्रेनेज लाईन टाकणे ३) वेस्ट वॉटर प्लांट बसविणे या कामाकरिता मे. उर्जल कन्सल्टंट प्रा. लि., पुणे यांची प्लॅनिंग व डिझाईनिंग याकरिता प्रोजेक्टच्या किंमतीवर २% शुल्क व काम सुरु झाल्यानंतर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्सी या कामाकरिता प्रोजेक्टच्या किंमतीवर २% या दराप्रमाणे नियुक्ती करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठ परिसरातील १) रेन वॉटर हार्वेस्टींग २) ड्रेनेज लाईन टाकणे ३) वेस्ट वॉटर प्लांट बसविणे या कामाकरिता मे. उर्जल कन्सल्टंट प्रा. लि., पुणे यांच्या नमूद केलेल्या दराप्रमाणे कन्सल्टंट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट या कामासाठी त्यांची नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय:**

**[५(१)] प्रस्तूत विद्यापीठाचे एम. एच. १३ एसी ९९८८ हुंडाई वेरणा व एम. एच. १३ बी ५९६६ टाटा सुमो या दोन वाहनास जास्त किंमत येणाच्या दृष्टीने सदर वाहने कंपनीस Buy-Back पध्दतीने न देता लिलाव पध्दतीने विक्री करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी दिलेली मान्यता व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: दि.२४ मे, २०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठ वाहन क्र.एम. एच. १३ एसी ९९८८ हुंडाई वेरणा व एम. एच. १३ बी ५९६६ टाटा सुमो स्पॅसिओ गोल्ड या वाहनांची Buy-Back पध्दतीने विक्री करण्यास मान्यता दिलेली असून त्याबदल्यात दोन नवीन वाहने विद्यापीठाच्या शैक्षणिक व कार्यालयीन कामासाठी विद्यापीठ स्वफंडातून खरेदी करण्याचा ठराव झालेला असून त्याअनुषंगाने प्रस्तूत विभागाने सदर दोन वाहने Buy-Back पध्दतीने कंपनीस देण्यासाठी Government Registered Valuator श्री. गणेश एस. विभूते यांनी व महिंन्द्रा कंपनीने कळविलेल्या किंमती खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| Government Registered Valuator यांनी काढलेली किंमत | एम. एच. १२ एसी ९९८८ | ₹३,००,०००/- |
| | एम. एच. १३ बी ५९६६ | ₹१,५०,०००/- |
| Buy-Back पध्दतीने महिंन्द्रा कंपनीने काढलेली किंमत | एम. एच. १३ एसी. ९९८८ | ₹१,९०,०००/- |
| | एम. एच. १३ बी ५९६६ | ₹५०,०००/- |

सबब, Government Registered Valuator यांनी दिलेली किंमत व Buy-Back पध्दतीसाठी महिंन्द्रा कंपनीने दिलेली किंमत विचारात घेता, सदर दोन वाहने महिंन्द्रा कंपनीस Buy-Back पध्दतीने न देता लिलाव पध्दतीने विक्री करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी दि.२२ जुलै, २०१६ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली होती. त्याअनुषंगाने प्रस्तूत विभागाने दि.१० ऑगस्ट, २०१६ रोजी सदर वाहनांची विक्री जाहिर लिलावाने करण्याची जाहिरात दि.३० जुलै, २०१६ रोजीच्या दै. संचारमध्ये दिलेली असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव: प्रस्तूत विद्यापीठाचे एम. एच. १३ ए.सी. ९९८८ हुंडाई वेरणा व एम. एच. १३ बी ५९६६ टाटा सुमो या दोन वाहनास जास्त किंमत येणाच्या दृष्टीने सदर वाहने कंपनीस Buy-Back पध्दतीने न देता लिलाव पध्दतीने विक्री करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.**

**[५(२)] शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुल व भूशास्त्र संकुलाकरिता उर्वरित सहायक प्राध्यापक (कंत्राटी) पदे भरण्यासाठी Walk in Interview ची द्वितीय जाहिरात प्रसिध्द करुन कंत्राटी शिक्षकीय पदे भरल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तूत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलांच्या एकूण कार्यभाराचा आढावा घेवून, नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळून उर्वरित अध्यापनाच्या कार्यभाराकरिता मा. कुलगुरुंनी एकूण ३९ सहायक प्राध्यापक (कंत्राटी) पदे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७७ नुसार भरण्याकरिता मंजूरी दिल्यानुसार दि.२८/०६/२०१६ व दि.२९/०६/२०१६ रोजी सदर पदे भरण्याकरिता मुलाखती घेण्यात आल्या. स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती आदेश पारित करण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन एकूण ३० कंत्राटी अध्यापक संबंधित संकुलात सेवेत रुजू झाले आहेत. त्यास व्यवस्थापन परिषदेने दि.२६/०७/२०१६ रोजी च्या बैठकीत ठराव क्र.०४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

रसायनशास्त्र संकुल व भूशास्त्र संकुल या दोन संकुलामधील उर्वरित कंत्राटी अध्यापकांची पदे भरण्याकरिता कुलगुरुंच्या आदेशान्वये दि.२६/०७/२०१६ रोजी पुनश्च: मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या ७ उमेदवारास नियुक्ती आदेश पारित करण्यात आले असून, संबंधित अध्यापक विद्यापीठाच्या सेवेत रुजू झाले आहेत. निवड झालेल्या उमेदवारांचा सारंश सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव: **शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुल व भूशास्त्र संकुलाकरिता उर्वरित सहायक प्राध्यापक (कंत्राटी) पदे भरण्यासाठी Walk in Interview ची द्वितीय जाहिरात प्रसिध्द करुन कंत्राटी शिक्षकीय पदे भरल्याच्या बाबीची नोंद घेण्यात आली.**

**[५(३)] लोकदैवत श्रीविठ्ठल अध्यासन केंद्र सोलापूर विद्यापीठात सुरु करण्यासंदर्भात शासनास प्रस्ताव पाठविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मा. राम नाईक, राज्यपाल उत्तरप्रदेश यांनी दि.१८ मे, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात श्रीविठ्ठल हे पंढरपूरातील जागृत दैवत आणि वारकरी संप्रदायाचे प्रेरणास्थान आहे. महाराष्ट्र प्रमाणे शेजारील कर्नाटक आणि आंध्रप्रदेशन या राज्यातून असंख्य भाविक या तीर्थक्षेत्राला नियमितपणे भेट देत असतात. अभ्यासक किंवा संशोधनाला लोकदैवत श्रीविठ्ठल किंवा वारकरी संप्रदायाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने अभ्यास व संशोधन केंद्राची संकल्पना योग्यच आहे. त्यासाठी या संकल्पनेला आपण मूर्तरुप द्यावे, अशी विनंती केली आहे.

यानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांनी १२ जून, २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्रानुसार सचिव सांकृतिक कार्य मंत्रालय मुंबई यांना योग्य त्या सूचना दिल्या आहेत. श्री. द. व. खारके, कार्यासन अधिकारी, मंत्रालय मुंबई यांनी त्यांच्या दि.०३ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या मा. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांना स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करावे, असे कळविले आहे. त्याची एक प्रत या कार्यालयास दिली आहे. तसेच श्री. ह. ब. शिंदे, वरिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय पुणे यांनी दि.१९ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रानुसार विद्यापीठास लोकदैवत श्रीविठ्ठल अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबत आपल्या विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय या संचालनालयास सादर करण्यात यावे असे कळविले आहे.

उपरोक्त पत्रानुसार विद्यापीठाने लोकदैवत श्रीविठ्ठल अध्यासन केंद्र स्थापित करण्याबाबतचा सर्वकष प्रस्ताव तज्ञसमिती गठीत करुन तयार केला असून सदर प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३०(३) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने १४(७) अन्वये स्वीकृत केलेला आहे.

सबब, सदर प्रस्ताव शासनास पाठविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **लोकदैवत श्रीविठ्ठल अध्यासन केंद्र सोलापूर विद्यापीठात सुरु करण्यासंदर्भात शासनास प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[५(४)] मे. बहुचर ट्रेडर्स, जीआर विपत हाउस, ५२, बोमानजी लाईन, योको सिझलेर्स रेस्टॉरंट, मुंबई या फर्मला काळ्या यादीत टाकण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षेच्या निकालाचे लेजर व मार्कशीट प्रिंट काढण्यासाठी विभागाकडे असलेल्या ६६१० या लिपी प्रिंटरसाठी ३० नग Cartridge आणि ६१०० या लिपी प्रिंटरसाठी २५.५, २५ mm Ribbon (Refilling Pack) २० Box असे साहित्य खरेदीकरिता विभागाकडील दि.१३/०५/२०१६ रोजीच्या मान्यतेच्या अनुषंगाने दरपत्रके मागविण्याची प्रक्रिया पूर्ण केली होती. सदरची प्रक्रिया पूर्ण करुन न्युनतम दर असलेल्या फर्म मे. जीआर मार्केटिंग पुणे यांना संदर्भ क्र.सोविसो/परीक्षा/११७७/५८४४, दि.२३/०६/२०१६ नुसार ६१०० या लिपी प्रिंटरसाठी २५.५, २५ mm Ribbon (Refilling Pack) २० Box चा पुरवठा आदेश देण्यात आला होता आणि मे. बहुचर ट्रेडर्स मुंबई यांना संदर्भ क्र.सोविसो / परीक्षा / ११७७ / ५८४५, दि.२३/०६/२०१६ नुसार ३० नग Cartridge चा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

१. वरीलप्रमाणे दोन्ही फर्मला पुरवठा आदेश दिला होता व मे. जीआर मार्केटिंग पुणे यांना दूरध्वनीवरुन विचारणा केली असता, कोणताही प्रतिसाद दिला नाही.
२. मे. बहुचर ट्रेडर्स मुंबई यांनी Cartridge चे दर प्रति नग रु.७८८/- वॅटसह असे चुकीने दिले असून, या दराने पुरवठा करु शकत नाही. Cartridge चे दर प्रति नग रु.२,१००/- वॅट जादा असे आहेत तरी प्रति नग रु.२,१००/- वॅट जादा प्रमाणे Cartridge चा पुरवठा करु शकतो असे पत्र दिले असून, सदर फर्मचे पत्र सोबत जोडले आहे.

सबब, वरील सर्व बाबीचा विचार करता, वरीलप्रमाणे दरपत्रके मागवून केलेली प्रक्रिया रद्द करावी व नव्याने दरपत्रके मागवून सदरची प्रक्रिया करण्याबाबत दि.०४/०८/२०१६ रोजी टिपणी ठेवलेली होती. सदर टिपणीवरती मे. बहुचर ट्रेडर्स, मुंबई या फर्मचे नाव काळ्या यादीत टाकणे, सदर फर्मकडून दरपत्रके मागवू नये, तसेच त्यांची दरपत्रके असल्यास ती दरपत्रके विचारात घेवू नये व सदर फर्मला तसे कळविण्यात यावे असे सूचित झाले असल्याने मे. बहुचर ट्रेडर्स, मुंबई या फर्मला काळ्या यादीत टाकणे गरजेचे आहे. वरील फर्मचे नाव काळ्या यादीत टाकण्याचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणे आवश्यक असल्याने, मे. बहुचर ट्रेडर्स, मुंबई या फर्मचे नाव काळ्या यादीत टाकण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **मे. बहुचर ट्रेडर्स, जीआर विपत हाउस, ५२, बोमानजी लाईन, योको सिझलेर्स रेस्टॉरंट, मुंबई या फर्मला काळ्या यादीत टाकण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[५(५)] **दि.११/०८/२०१६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.०२/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.०२/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.324 नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.११/०८/२०१६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०२/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **दि.०२/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने दि.११/०८/२०१६ च्या बैठकीत केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[५(६)] दि.११/०८/२०१६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.११/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.११/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.324 नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.११/०८/२०१६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.११/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: दि.११/०८/२०१६ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने दि.११/०८/२०१६ च्या बैठकीत केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[५(७)] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या १६(१) अन्वये नामनिर्देशित प्राचार्य आर. वाय. पाटील, संचालक म.वि.वि.मं. यांचा वेतन प्रस्ताव विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या १६(१) अन्वये प्राचार्य आर. वाय. पाटील यांचे संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ पदी वेतन बँड रु.३७,४००-६७,००० या वेतन बँडमध्ये मूळ वेतन रु.४३,०००/- (ग्रेड वेतन १०,०००/-) नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भात विभागीय सहसंचालक सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या पत्र क्र.विससं/उशि/सोविसो/२०१६/७५१, दि.०८/०३/२०१६ नुसार प्राचार्य आर. वाय. पाटील यांच्या वेतन निश्चितीस प्रारंभिक वेतन रु.३७,४००/- (ग्रेड वेतन १०,०००/-) या प्रारंभिक वेतनावर वेतन निश्चितीस मान्यता मिळालेली आहे. सदर संबंधी प्राचार्य आर. वाय. पाटील यांना कार्यालयीन पत्र क्र.SUS/Estt/२०१६/२९८६, दि.१९ मार्च, २०१६ अन्वये कळविण्यात आले असता, प्राचार्य आर. वाय. पाटील यांनी दि.२३/०३/२०१६ रोजी पत्रान्वये कळविले की, त्यांची नेमणूक मा. कुलगुरुंच्या नामनिर्देशनाने झालेली असल्याने व निवड समितीमार्फत झालेली नसल्याने वेतन निश्चिती होत नसून वेतन संरक्षण होते. प्राचार्य आर. वाय. पाटील, डी. एस. टी. एस. मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूरचे अध्यक्ष यांनी प्रमाणित करुन दिलेल्या विद्यापीठाच्या सेवेत रुजू होण्यापूर्वीचे वेतन रु.६३,१८०/- (ग्रेड वेतन १०,०००/-) या वेतनाचे संरक्षण विषयी कार्यवाही विभागीय सहसंचालक सोलापूर विभाग, सोलापूर या कार्यालयात प्रलंबित आहे. सदर वेतन संरक्षण होऊन येईपर्यंत मा. कुलगुरुंनी नामनिर्देशित केल्याप्रमाणे व कार्यालयीन पत्र क्र.SUS/Estt/२०१६/२९८६, दि.१९ मार्च, २०१६ प्रमाणे प्राचार्य आर. वाय. पाटील यांचे वेतन रु.४३,०००/- (ग्रेड वेतन १०,०००/-) प्रमाणे आदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या १६(१) अन्वये नामनिर्देशित प्राचार्य आर. वाय. पाटील, संचालक म.वि.वि.मं. यांना वेतन रु.४३,०००/- (ग्रेड वेतन १०,०००/-) प्रमाणे आदा करण्याच्या वेतन प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[५(८)] सोलापूर विद्यापीठ संकुल तसेच संलग्नित महाविद्यालयातून नियमित एम.एस्सी. संख्याशास्त्र या विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी "श्रीमती सुलभा शंकर पांडे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु.१,०६,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: डॉ. माधुरी उमाकांत वाळवेकर, वाळवेकर नर्सिंग होम यांनी सोलापूर विद्यापीठ संकुल तसेच संलग्नित महाविद्यालयातून नियमित एम. एस्सी. संख्याशास्त्र या विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी "श्रीमती सुलभा शंकर पांडे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्यासाठी दि.०३/०८/२०१६ रोजीच्या पत्रासोबत रु.१,०६,०००/- (अक्षरी एक लाख सहा हजार फक्त) इतकी देणगी विद्यापीठास धनादेशाद्वारे दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी उपरोक्त नमूद नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला होता.

डॉ. माधुरी उमाकांत वाळवेकर, वाळवेकर नर्सिंग होम यांच्याकडून सुवर्णपदकासाठी रु.१,०६,०००/- (अक्षरी एक लाख सहा हजार रुपये फक्त) इतकी रक्कम देणगी म्हणून धनादेशाद्वारे स्विकारण्यास महाराष्ट्र कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागास जमा करण्यात आला असून रु.१,०६,०००/- इतक्या रक्कमेची पावती वित्त व लेखा विभागाने अभ्यासमंडळे विभागाकडे जमा केलेली आहे.

सबब, मा. कुलगुरु महोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव: **मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[५(९)] श्रीमती सविता राजीव दिपाली, वास्तुविशारद व इंटेरियर डिझाईनर यांना कामाच्या मोबदल्यात द्यावयाच्या शुल्काची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: दि.३१ जुलै, २०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये वर्क स्टेशनसाठी लागणाऱ्या फर्निचरच्या डिझाईनचे काम हे श्रीमती सविता राजीव दिपाली, वास्तुविशारद व इंटेरियर डिझाईनर यांना देण्यात आलेले आहे. त्यांनी तयार केलेल्या ७५.०० लाखाच्या अंदाजपत्रकास दि.२३ फेब्रुवारी, २०१६ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. श्रीमती सविता राजीव दिपाली, वास्तुविशारद यांना सदरचे काम देताना त्यांना द्यावयाचे शुल्क ठरविण्यात आलेली नसल्यामूळे सद्यस्थितीत आपल्याकडे वास्तुविशारद यांना देण्यात येत असलेल्या प्रचलित शुल्काचा तक्ता सोबत जोडलेला असून, सदर तक्त्यामध्ये श्रीमती दिपाली यांना देण्यात आलेले फक्त फर्निचरच्या डिझाईन व प्लॅनिंगचा या तक्त्यात स्पष्ट उल्लेख नाही. श्रीमती दिपाली यांना ऑफिस रुमच्या साईजनुसार फर्निचरचे प्लॅनिंग डिझाईनींग करावयाचे आहे. तसेच त्याचे अंदाजपत्रक तयार करणे, ई-टेंडरसाठी लागणारे सर्व शर्ती, अटी व फर्निचरचे स्पेसिफिकेशन देण्याचे कामे त्यांनी करावयाची आहेत.

तसेच फर्निचर करावयाचे काम चालू असताना आपण वेगळी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंन्टची नेमणूक करत नसून, श्रीमती दिपाली यांच्याकडूनच सदरच्या कामाची क्वॉलिटी, साईज व स्पेशिफिकेशननुसार कामे करुन घ्यावयाची आहेत. तसेच ठेकेदारांना देण्यात येणारे बिलही त्यांनी तपासून पेमेंटसाठी सर्टीफाय करावयाचे आहे. तसेच सदर काम संपेपर्यंत त्यांची जबाबदारी राहणार आहे. त्यामूळे अशाप्रकारच्या बांधकामांना आपण वास्तुविशारदसाठी २% व प्रोजक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंन्टसाठी २% दिलेले आहेत. परंतु फर्निचरचे काम त्यापेक्षा वेगळे असल्याने यांना वरीलप्रमाणे संपूर्ण कामासाठी प्रत्यक्ष कामाच्या खर्चाच्या ३% प्रमाणे फी देणे योग्य असल्यामूळे प्रस्तूत कार्यालयाच्या दि.०९/०८/२०१६ रोजीच्या टिपणीन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी श्रीमती सविता राजीव दिपाली यांना प्रत्यक्ष कामाच्या खर्चाच्या ३% प्रमाणे फी देण्यास मान्यता दिलेली आहे.

सबब, श्रीमती सविता राजीव दिपाली वास्तुविशारद व इंटेरियर डिझाईनर यांना देण्यात आलेले वर्क स्टेशनसाठी लागणारे ७५.०० लाखाच्या कामाच्या मोबदल्यात ३% शुल्क देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव: श्रीमती सविता राजीव दिपाली, वास्तुविशारद व इंटेरियर डिझाईनर यांना कामाच्या मोबदल्यात द्यावयाच्या शुल्काच्या बाबीची नोंद घेण्यात आली.**

## [५(१०)] सांख्यिकी सहायक या पदाची अनुभव संदर्भातील अट विचारार्थ.

(टिपणी: विद्यापीठातील वर्ग ३ व ४ या संवर्गातील रिक्त पदांच्या भरती करीता दि.०२/०६/२०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीत सांख्यिकी सहायक या पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता नूमद केलेली आहे.

१. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.एस्सी. (गणित / सांख्यिकी) / एम. कॉम. (गणित / सांख्यिकी) पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.
२. शासकीय / निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.
३. इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. आणि मराठी ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक.
४. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**जाहिरातीस** अनुसरुन सांख्यिकी सहायक या पदासाठी प्राप्त झालेल्या आवेदन पत्रानुसार दि.२५ जून २०१६ रोजी सांख्यिकी सहायक या पदाची लेखी परीक्षा घेण्यात आली आहे.

या अनुषंगाने सांख्यिकी सहायक या संवर्गाच्या लेखी परीक्षांच्या प्रश्नपत्रिका व संभाव्य उत्तरसूची उमेदवारांच्या माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.

बहिस्थ: एजन्सीकडून लेखी परीक्षेतील व्यावसायिक चाचणीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन दि.२३/०७/२०१६ रोजी व्यावसायिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची ८० गुणाची व्यावसायिक चाचणी विद्यापीठात घेण्यात आली. दि.०२/०६/२०१६ रोजी वर्ग ३ व ४ या संवर्गातील रिक्त पदांच्या भरती संदर्भात विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या सर्वसाधारण सूचना क्रं ६ उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराने लेखी परीक्षेत व व्यावसायिक चाचणीत प्रत्येकी किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन सांख्यिकी सहायक या पदाकरिता गुणवत्ता यादीत फक्त २ च उमेदवार गुणवत्तेनुसार पात्र होतात. तथापि, जाहिरातीत नमुद मुददा क्र.२ अनुभवाची अट पूर्ण करण्याबाबत काही संदिग्धता दिसून येत आहे. सांख्यिकी सहायक हे पद विद्यापीठास शिक्षकेत्तर पदाच्या आकृतिबंधानुसार शासन निर्णय क्र.एसयुएस-२०१५/(१२३/०५)/विशि-५, दि.११ मे, २००७ आणि शासन निर्णय क्र.एसयुएस २००९/(३९०/०९)/विशि-१, दि.१९/०९/२००९ नुसार मंजूर झालेले आहे. सदर पदास विद्यापीठाने विविध जाहिराती प्रसिध्द केलेल्या आहेत. तथापि, आजअखेर सांख्यिकी सहायक पद रिक्त आहे. महाराष्ट्र शासनाच्या कालानुरुप शिक्षकेत्तर भरती संदर्भात भरती बंदी व पद व्यपगत करुन इतर पर्यायी व्यवस्था करुन प्रशासनिक कामकाज करण्याकडे कल दिसून येत आहे. सांख्यिकी सहायक हे पद अकृषि विद्यापीठातील सांख्यिकी कामकाजासाठी सदरचे पद भरणे अनिवार्य आहे. ही बाब विचारार्थ घेता, गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे प्रथम उमेदवाराची निवड करण्यासाठी जाहिरातीत नमुद अनुभव शिथिल करण्याची भरती प्रक्रिया समितीने केलेली शिफारस स्विकारणे योग्य होईल, असे मत आहे.

सबब, विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीची सांख्यिकी सहायक या पदाची अनुभवा संदर्भातील अटी संदर्भातील शिफारस विचारार्थ).

ठराव: **जाहिरातीत नमूद अनुभव शिथिल करण्याची भरती प्रक्रिया समितीची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सांख्यिकी सहायक या पदाकरिता जाहिरातीत नमूद अनुभवाची अट "शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक" अशी आहे या ऐवजी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(न) अन्वये विद्यापीठातील सांख्यिकी सहायक पदासाठी "शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामचा ३ वर्षाचा अनुभव असल्यास प्राध्यान्य" अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[५(११)] भांडारपाल या पदासाठी उमेदवार निवडीसाठी अनुभव निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठातील वर्ग ३ व ४ या संवर्गातील रिक्त पदांच्या भरती करीता दि.०२/०६/२०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीत भांडारपाल या पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता नूमद केलेली आहे.

१. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान / वाणिज्य शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
२. शासकीय / निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक
३. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

जाहीरातीस अनुसरुन भांडारपाल यापदासाठी प्राप्त झालेल्या अर्जान्वये लेखी परीक्षा दि.२५/०६/२०१६ रोजी घेण्यात आली आहे.

यानुसार भांडारपाल पदाच्या लेखी परीक्षेत पात्र झालेल्या उमेदवारांची संभाव्य गुणवत्ता यादी विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

भांडारपाल पदासाठी उमेदवाराची निवड करण्याबाबतचा विषय दि.०५/०७/२०१६ रोजीच्या भरती प्रक्रिया समितीसमोर सादर केला असता, भांडारपाल पदासाठी जाहीरातीत नमूद शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व अनुभवाची गणना करतेवेळी तत्सम पदासंदर्भात तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने सदर समितीने खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

**"भांडारपाल पदासाठी अंतिम गुणवत्ता यादीनुसार पात्र झालेल्या उमेदवारांचे जाहीरातीत नमूद केल्यानुसार शासकीय/निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक असल्याने अनुभवा संदर्भात सर्वच ४८ अर्जाची कार्यालयीन स्तरावर छाननी करुन अहवालासह सदरचा विषय पुढील बैठकीत फेरसादर करावा असे सर्वानुमते ठरले." व तसेच समिती सदस्यांनी तोंडी सदर पदाच्या अनुभवाबाबत कार्यालयीन मत सादर करावे असे सूचित केले होते.**

**त्यास अनुसरुन भांडारपाल या पदासाठी उमेदवारांची निवड करताना अनुभव अर्हता संदर्भातील मत खालील प्रमाणे आहे.**

१. यामध्ये शासकीय व निमशासकीय धान्य गोदाम, अन्न धान्य पुरवठा विभाग, औषध विभाग, यंत्र सामग्री, शासकीय रूग्णालय, महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ, जिल्हा परिषद, महानगर पालिका, नगर परिषद, विद्यापीठ शैक्षणिक संस्था व इत्यादी कार्यालयातील भांडारपाल पदाच्या कामा संदर्भातील कामांचा अनुभव असणाऱ्यांना प्रथम प्राधान्य द्यावे असे वाटते.
२. वेतन श्रेणी / बँड मधील वेतन पी.बी.२ रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रु. ४३००/- हे भांडारपाल पदासाठी लागू असलेल्या वेतनाप्रमाणे किंवा वेतनापेक्षा एका टप्प्याने कमी असणाऱ्या पात्र उमेदवारांना व्दितीय प्राधान्य द्यावे.

३. विद्यापीठातील भांडारपाल पदासाठी विद्यापीठ किंवा महाविद्यालयात प्रयोगशाळा सहायक या पदावर किमान १५ वर्षाचा किंवा त्यापेक्षा अधिक अनुभव असणाऱ्या उमदेवारास तृतीय प्राधान्य देण्यात यावे असे कार्यालयाचे मत आहे.

तसेच समिती सदस्यांच्या ठरावानुसार सर्व पात्र ४८ उमेदवारांची कार्यलयीन स्तरावर केलेल्या छाननीचा अहवाल दि.०३/०८/२०१६ रोजीच्या भरती प्रक्रिया समितीसमोर सादर केला असता, समितीने खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

**१) भांडारपाल या पदांच्या लेखी परीक्षेत पात्र ४८ उमेदवारांच्या अर्जाची छाननी करण्यात आली व सोबत जोडल्याप्रमाणे अहवाल तयार करण्यात आला.**

**२) भांडारपाल या पदासाठी जाहिरातीत नमूद तत्सम पदाचा अनुभव संदर्भात कार्यालयाने सादर केलेल्या मताची नोंद घेण्यात आली.**

भांडारपाल हे पद विद्यापीठास शिक्षकेत्तर पदाच्या आकृतिबंधानुसार शासन निर्णय क्र.एसयुएस-२०१५/(१२३/०५)/विशि-५, दि.११ मे, २००७ आणि शासन निर्णय क्र.एसयुएस २००९/(३९०/०९)/विशि-१, दि.१९/०९/२००९ नुसार मंजूर झालेले आहे. सदर पदास विद्यापीठाने विविध जाहिराती प्रसिध्द केलेल्या आहेत. तथापि, आजअखेर भांडारपाल पद रिक्त आहे. महाराष्ट्र शासनाच्या कालानुरुप शिक्षकेत्तर भरती संदर्भात भरती बंदी व पद व्यपगत करुन इतर पर्यायी व्यवस्था करुन प्रशासनिक कामकाज करण्याकडे कल दिसून येत आहे. भांडारपाल हे पद अकृषि विद्यापीठातील भांडारसंबंधी कामकाजासाठी सदरचे पद भरणे अनिवार्य आहे. ही बाब विचारार्थ घेता, गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे प्रथम उमेदवाराची निवड करण्यासाठी जाहिरातीत नमुद अनुभव अर्हता वरील १,२ व ३ प्रमाणे बदलण्याची भरती प्रक्रिया समितीची शिफारस स्विकारणे योग्य राहील, असे मत आहे.

सबब, सदर पदासाठी अनुभवाच्या ग्राह्यतेबाबत पुढील निर्णय घेण्यासाठी विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीची भांडारपाल या पदासाठी उमेदवार निवडीसाठी अनुभव निश्चित करण्याची शिफारीशीची बाब विचारार्थ).

ठराव: **भरती प्रक्रिया समितीची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. भांडारपाल या पदाकरिता जाहिरातीत नमूद अनुभवाची अट "शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक" अशी आहे या ऐवजी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(न) अन्वये भांडारपाल पदासाठी वरील १, २ व ३ प्रमाणे "विद्यापीठ किंवा महाविद्यालयात प्रयोगशाळा सहायक या पदावर किमान १५ वर्षाचा किंवा त्यापेक्षा अधिक अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राध्यान्य" अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[५(१२)] कनिष्ठ लिपिक संवर्गातील इतर मागासवर्ग व खुला महिला आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (न) मधील तरतूदीनुसार नियुक्तीच्या कार्यपध्दतीत दुरुस्ती करुन गुणानुक्रमे गुणवत्ता यादीत आलेल्या संबंधित उमेदवारांची, विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीच्या बैठकी दिवशी आवश्यक कागदपत्रानुसार तात्पुरती व अंतिम निवड करण्याच्या बाबीची विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील रिक्त पदांच्या जाहिराती (जाहिरात दि.२१/०४/२०१२, ०७/०५/२०१२ व ०४/०६/२०१२) सन २०१५ मध्ये (दि.०२/०६/२०१५) अशा चार विविध वर्तमान पत्रात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन आवेदनपत्र मागविण्यात आले होते. विद्यापीठास प्राप्त झालेले आवेदनपत्रांची छाननी न करता भरतीची लेखी परीक्षा घेण्यात आलेली आहे. लेखी परीक्षेत व व्यावसायिक चाचणीत गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडे जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र आवेदनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी उपलब्ध नाहीत.

तथापि, गुणवत्तेनुसार गुणवत्ता यादीमध्ये प्रथम क्रमांकावर आलेले उमेदवार तांत्रिक कारणामुळे निवडीपासून वंचित राहू नये म्हणून जाहिरातीमधील अट महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (न) मधील तरतूदीनुसार नियुक्तीच्या कार्यपध्दतीत दुरुस्ती करता येईल. म्हणजेच जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटीत अर्ज करण्याच्या शेवटच्या तारखे ऐवजी विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीच्या बैठकी दिवशी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असणे आवश्यक अशी दुरुस्ती केल्यास गुणानुक्रमे गुणवत्ता यादीत आलेले उमेदवार निवडीपासून वंचित राहाणार नाहीत. तसेच गुणवत्ता प्राप्त केलेल्या उमदेवारांची निवड करणे सोयीचे होईल. त्याचप्रमाणे गुणवत्ता क्रम लावल्यामुळे न्यायालयीन प्रकरण/तक्रारी ही उद्भवणार नाहीत.

यास्तव कनिष्ठ लिपिक संवर्गातील इतर मागासवर्ग व खुला महिला आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (न) मधील तरतूदीनुसार नियुक्तीच्या कार्यपध्दतीत दुरुस्ती करुन गुणानुक्रमे गुणवत्ता यादीत आलेल्या संबंधित उमेदवारांची, विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीच्या बैठकी दिवशी आवश्यक कागदपत्रानुसार तात्पुरती व अंतिम निवड करण्याच्या बाबीची विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

ठराव: **कनिष्ठ लिपिक संवर्गातील इतर मागासवर्ग व खुला महिला आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (न) मधील तरतूदीनुसार नियुक्तीच्या कार्यपध्दतीत दुरुस्ती करुन गुणानुक्रमे गुणवत्ता यादीत आलेल्या संबंधित उमेदवारांची, विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीच्या बैठकी दिवशी आवश्यक कागदपत्रानुसार तात्पुरती व अंतिम निवड करण्याच्या बाबीची विद्यापीठ भरती प्रक्रिया समितीची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[५(१३)] NMEICT प्रकल्पातंर्गत विद्यापीठ परिसरात वाय-फाय सुविधा कार्यान्वित करण्यासाठी प्राप्त झालेल्या रु.१३ लाख निधीतून अनुषंगिक प्रक्रिया करुन वाय-फाय सुविधा कार्यान्वित करण्यासाठी तज्ञाचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणी: NMEICT प्रकल्पातंर्गत विद्यापीठ परिसरात Central Sponsored Plan Scheme अंतर्गत मार्च २०१६ मध्ये रु.१३ लाख निधी मंजूर झाला असून यापैकी जवळपास रु.११.६९ लाख निधी विद्यापीठास प्राप्त झालेला आहे.

सदर प्राप्त निधीतून विद्यापीठ परिसरात वाय-फाय सुविधा कार्यान्वित करण्यासाठी हा विषय तांत्रिक समितीसमोर दि.२२/०७/२०१६ रोजी सादर केला होता. तसेच या बैठकीवेळी ही सुविधा देणाऱ्या काही विक्रेत्यांना बोलाविले होते. परंतु, तांत्रिक समितीने सदरची अनुषंगिक कामे बाहेरील फर्मना देण्याऐवजी ही संपूर्ण प्रकिया करण्यासाठी एका तज्ञाचे नामनिर्देशन करणे सोयीचे होईल असे मत व्यक्त केले आहे. तसे तांत्रिक समितीचे अध्यक्ष प्रा. एस. एस. सूर्यवंशी यांनी दि.११/०८/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

सबब, सदरची बाब लक्षात घेता, NMEICT प्रकल्पातंर्गत विद्यापीठ परिसरात वाय-फाय सुविधा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक टेंडर मागविण्याची प्रक्रिया पूर्ण करणे व संपूर्णपणे वाय-फाय सुविधा कार्यान्वित करेपर्यंतची सर्व अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी एका तज्ञाचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **NMEICT प्रकल्पातंर्गत विद्यापीठ परिसरात वाय-फाय सुविधा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक टेंडर मागविण्याची प्रक्रिया पूर्ण करणे व संपूर्णपणे वाय-फाय सुविधा कार्यान्वित करेपर्यंतची सर्व अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी एका तज्ञाचे नामनिर्देशन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| सचिव | अध्यक्ष |
| व्यवस्थापन परिषद | व्यवस्थापन परिषद |